# ।। ग्यान गोष्ट हरकिशनजी रो संवाद ।।
# मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। ग्यान गोष्ट को अंग ।।

अथ संत सुखरामजी और हरकिशनजी रो संमाद लिखंते ।। चोपाई ।। हरकिशनजी वाच ।।

हो जन मे बुजत हुँ भेवा ।। किरपा कर कहिये गुरूदेवा ।।
अे पांचू तत्त कांहा सुं होई ।। तां का भेव कहो गुरू मोई ।।१।।

हर किसनजी ने,हे पाच तत्व कोठून आले,याचा भेद मला सांगा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलला.।।१।।

श्री सुखोवाच ।।

हे सिष पारब्रम्ह परमातम देवा ।। तां सुं तत्त ऊपज्या भेवा ।।
पीछे मन्ड सकल बिस्तारा ।। ओऊँ सोऊँ सबे पसारा ।।२।।

हे शिष्य,पारब्रह्म परमात्मा देव आहे,त्यापासुन तत्व उत्पन्न झाले,ते तत्व उत्पन्न झाल्यावर साऱ्या सृष्टीचा तसेच ओअम आणि सोहम सर्वांचा पसारा झाला.।।२।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी ओऊँ शब्द कहाँ सुं होई ।। ता का भेव कहो गुरू मोई ।।
केसी सिष्ट जीव उपजाया ।। पाँच तत्त केसे कर कुवाया ।।३।।

शिष्याने सांगितले,हे स्वामीजी,हा ओअम शब्द कोठून आला,ही सृष्टी कशी बनवली आणि जीव कसे उपजविले आणि पाच तत्व कसे म्हणवले.याचा भेद मला सांगा.।।३।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष परापरी परब्रम्ह कहावे ।। ता सुं देव निरंजण गावे ।।
सो आकास के तत्त भाया ।। बाय तत्त सो ओऊँ कहाया ।।४।।

गुरु बोलले,हे शिष्य,परापरी म्हणजे आदिच्या ही आदि पारब्रह्म म्हणवला,त्यापासुन निरंजन देव उत्पन्न झाला,तो आकाश तत्वाने उत्पन्न झाला आणि वायुपासुन ओअम झाला. ।।४।।

सिष वाच ।।

ओऊँ शब्द कहाँ का होई ।। तां का भेव कहो गुरू मोई ।।
केसे बन्ध्या कोण बिध साई ।। अे सब सकळ जीव के माई ।।५।।

शिष्य बोलला,हा ओअम शब्द कोठून झाला,हा कसा बांधला व कोणत्या विधीने बांधला,हा सर्व जीवांच्या आंत कसा कोणत्या रीतीने बांधल्या गेला.याचा भेद तुम्ही आपण गुरुजी मला सांगा.।।५।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष पराब्रम्ह से ब्रम्हंड होई ।। ता सुं बाय ऊपज्यो सोई ।।
तेज तत्त पवन उपजायो ।। सो निरंजण रूपी देव कुवायो ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले की, हे शिष्य, पारब्रह्मपासून हा ब्रह्मांड

झाला,त्या ब्रह्मांड म्हणजे आकाशापासुन वायु उत्पन्न झाला,वायुपासुन अग्नी म्हणजे निरंजन देव बनला. ।।६।।

**हे सिष तेज तत्त सुं तोय होई ।। ता सुं मही धरण आ जोई ।।**
**असे तत्त पांच अे हुवा ।। हे सिष गुण सुं कहिये जुवा ।।७।।**

हे शिष्य,या अग्नी तत्वापासुन जळ उत्पन्न झाले आणि त्या पाण्यापासुन ही धरती उत्पन्न झाली,या प्रकारे हे पांच तत्व उत्पन्न झाले,हे आपल्या आपल्या गुणाच्या प्रमाणा नुसार वेग–वेगळे झाले. ।।७।।

**स्याम रंग ब्रेहमंड को जोई ।। लिलो रंग बाय सूं होई ।।**
**जो ओ लाल दिखावे भाई ।। तेज तत्त सुं उपज्यो आई ।।८।।**

हे शिष्य,काळा रंग आकाशापासून झाला आणि हा हिरवा रंग वायुपासुन झाला आणि जो हा लाल रंग दिसतो,तो अग्नी पासुन उत्पन्न झाला. ।।८।।

**हे सिष सेत रंग तोय सुं होई ।। पीलो रंग धरण सुं जोई ।।**
**अे पांचू रंग सिष्ट मे भाया ।। तत्त सुं उपज जक्त मे आया ।।९।।**

हे शिष्य,पांढरा रंग पाण्यापासुन उत्पन्न झाला आणि पिवळा रंग धरती(पृथ्वी)पासुन उत्पन्न झाला,अशाप्रकारे सृष्टीत पाच रंग पाची तत्वापासुन उत्पन्न झाले. ।।९।।

सिष वायक ।।

**हो स्वामीजी तत्त का रंग कहया तम सोई । पण खट रस साव का हा का होई**
**या को भेव कहो गुरूराया ।। केसे सब अे बास उपाया ।।१०।।**

शिष्याने सांगितले की,(शिष्य म्हणाला की)हे स्वामीजी,हे तत्व आणि पाच तत्वांचे रंग आपण सर्व सांगितले,परंतु सहा रसांचा स्वाद कोणापासुन बनला?आणि कसे यांच्या राहण्याचे स्थान उत्पन्न केले.गुरुराय,याचा भेद मला सांगा.।।१०।।

श्री सुखो वाच ।।

**हे सिष ब्रम्हंड तत्त कहिजे भाया ।। कडवा साव वहां ते आया ।।**
**बाय तत्त सुं खाटा होई ।। तेज तत्त सुं चरका जोई ।।११।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले की,हे शिष्य,आकाश तत्व म्हणतात, त्या आकाशापासुन कड्वा(कडू)स्वाद उत्पन्न झाला आणि वायु तत्वापासुन आंबट स्वाद उत्पन्न झाला.अग्नी तत्वापासुन तिखट स्वाद उत्पन्न झाला आहे.।।११।।

**हे सिष फिका साव अप सुं जाणो ।। मिठा धरणी मही बखाणो ।।**
**पांचू साब मिले तब भाई ।। छटो साब अनोप कहाई ।।१२।।**

फिका स्वाद पाण्यापासुन उत्पन्न झाला.गोड स्वाद धरती म्हणजे पृथ्वीपासुन उत्पन्न झाला अशाप्रकारे पाची रसात एक किंवा दोन किंवा तीन व चार एकमेकात(एक दुसऱ्यात) मिळाल्यावर सहावा अनुप म्हणजे ज्याची उपमा दिली जात नाही असे,एकात एक

किंवा अनेक मिश्रण केल्यावर सहावा स्वाद बनुन जातो,अशाप्रकारे हे सहा रसांचे सहा सांगितले. ।।१२।।

सिष वायक ।।

हो स्वामाजी खट रस साव भेव तम दिया ।। असे बण्या इसी बिध किया ।।
अे हम भेव सुणे सुख पाया ।। अब मे या बूजू गुरूराया ।।१३।।

अहो स्वामीजी,सहा रसांच्या स्वादाचा भेद आपण कसे बनले आणि कसे बनवले हा भेद सांगितला.हा भेद ऐकून मला सुख मिळाले,आदि सतगुरु सुखरामजी महाराज, आता मी आपल्याला आणखीही विचारतो आहे. ।।१३।।

हो स्वामीजी प्रगत पाँच बिष बीस किम होई ।। तां को भेव कहो गुरू मोई ।।
भिन भिन कर निर्णा सब दिजे ।। या का अर्थ खोल गुरू कीजे ।।१४।।

हे स्वामीजी,पंचवीस प्रकृती कशा बनतात,आदि सतगुरु सुखरामजी महाराज,याचा भेद मला सांगा,याचा सर्व वेग-वेगळा करुन सर्व निर्णय मला द्या,याचा अर्थ प्रगट करुन मला सांगा. ।।१४।।

श्री सुखो वाच ।।

नाड़ि रोम तुचा सुण भाई ।। मेद अस्त बण्या बिध मांई ।।
अे प्रगत पांचू सुण भाई ।। मही तत्त सुं उपजे आई ।।१५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले की,नाडी,केस,त्वचा,मांस आणि हड्डी हे पांच प्रकृती पृथ्वी तत्वापासून बनलेली आहे. ।।१५।।

हे सिष थूक लाळ मुत्र ओ कहिये ।। लोहिबिन्द पसेव रहिये ।।
अे पांचू प्रगत सुण भाई ।। तोय तत्त सुं उपजे मांई ।।१६।।

रक्त,घाम,मुत्र,विर्य आणि लाळ ह्या पांच प्रकृती जळ तत्वापासुन उत्पन्न झाल्या आहेत. ।।१६।।

हे सिष तिरषा नींद कामना जागे ।। खुद्या आलस देह तन भागे ।।
अे प्रगत पांचू सुण भाई ।। तेज तत्त सुं उपजे मांई ।।१७।।

झोप,जांभई,आळस,भुक आणि तहान ह्या पांच प्रकृती अग्नी तत्वापासुन उत्पन्न झाल्या आहेत.।।१७।।

हे सिष गावण लडण दोड़ बोहो होई ।। ऊँची हाक ख्याल करे कोई ।।
अे प्रगत पांचू सुण भाई ।। वाय तत्त से ऊपजे मांई ।।१८।।

पळणे,पसरविणे(खेळणे,गाणे,जोराने हाक देणे),संकोचने,काळजी ह्या पांच प्रकृती वायु तत्वा पासुन बनलेल्या आहेत. ।।१८।।

हे सिष राग धेक अे डींभ कहावे ।। पकडे मून मोहो घट आवे ।।
अे प्रगत पांचू सुण भाई ।। ब्रेमंड सुं उपजत आई ।।१९।।

काम,क्रोध(राग द्वेष),मोह,लोभ,दंभ(अहंकार)ह्या पांची प्रकृती आकाश तत्वापासुन उत्पन्न झाल्या. ।।१९।।

**अे तत्त पांच सुणाया तोही ।। तिन की अे प्रगत ही होई ।।**
**इण को ठाट सबे सुण साई ।। तिनु चवदे लोक कहाई ।।२०।।**

हे पांच तत्वाच्या पंचवीस प्रकृती तुम्हाला(तुला)सांगितल्या,ह्या पाच तत्वाचा पंचवीस प्रकृतीचा सर्व थाट आहे,पांच तत्व आणि पंचवीस प्रकृतीचे तीन लोक,चवदा भुवन आहेत. ।।२०।।

सिष वायक ।।

**हो स्वामीजी अे तम भेद बहोत बिध दिया ।। भांत भांत कर निर्णा किया ।।**
**अब मे या बुजू गुरू सोई ।। देह अस्थूल कांहा को होई ।।२१।।**

शिष्याने सांगितले की,अहो स्वामीजी,हा भेद आपण खुप तऱ्हेने सांगितला.सर्व अनेक तऱ्हेने निर्णय केला.आता गुरुजी,मी हे विचारतो,हा स्थुळ देह कसा बनवतात.(कसा बनतो).।।२१।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष सरब धात की आ देह होई ।। जो अस्थुल बण्यो हे सोई ।।
जेती देह दिष्ट में आवे ।। सो सब सांतु धात कुवावे ।। २२ ।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी बोलले की,गुरु म्हणाले,हे रस,रक्त,मांस,मेद, मज्जा,अस्थी,रेत),या सात धातुंचा हा देह बनतो.जितके देह दिसतात ते सर्व सात धातूचे बनलेले आहेत. ।।२२।।

सिष वाच ।।

**हो स्वामीजी सात धात काहां की होई ।। ताको भेव कहो गुरू मोई ।।**
**कसें जीव आत्मा सांई ।। सो गुरू भेद कहो मुज तांई ।।२३।।**

शिष्य विचारले की,अहो स्वामीजी,हे सात धातू कशाचे बनतात,याचा भेद तुम्ही मला सांगा आणि हा जीव कशाने बनतो,हा सर्व भेद मला सांगा. ।।२३।।

श्री सुखो वाच ।।

**नाड़ी रोम तुचा सुण भाई ।। मेदा अस्त बण्या अे मांई ।।**
**अे पांचू धात मही सुं होई ।। हे सिष ओर बताऊँ तोई ।।२४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले,हे शिष्य,आणखी ही तुला सांगतो,नाडी, केस, कातडी,मेद आणि हाडे हे जे शरीरात बनले आहेत,हे पाची धातू पृथ्वीचे बनले आहेत,हे शिष्य,अधिक तुला दाखवितो.।।२४।।

**हे सिष लोई बिंद धातत्रे जाणो ।। अप तत्त सुं ओ पत ठाणो ।।**
**सातुं धात बणी ये सोई ।। दोय तत्त सुं प्रगट होई ।।२५।।**

हे शिष्य,रक्त,वीर्य हे दोन धातू याची जळ तत्वापासुन उत्पन्न झाले आहेत,अशाप्रकारे

हे सात धातू पृथ्वी व जळ तत्वापासुन उत्पन्न झाले आहे. ।।२५।।

हे सिष देह अस्थुल बण्यो ओ भाई ।। पांचू तत्त बिराजे मांही ।।
एसो जीव आत्मा कहिये ।। जेसे नाम रूख को लहिये ।।२६।।

हे शिष्य,ह्या स्थुळ शरीरात पाच तत्व आहेत,हे सात धातू दोन तत्वापासुन उत्पन्न झाले आहेत,हे सर्व जीव आत्माच आहेत,जसे वृक्षाची नावे वेग–वेगळी असतात.तसेच आत्म्याचे नाव वेग–वेगळे आहे.।।२६।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी ओ तम भेद कहयो समजाई ।। एसो जीव आत्मा कुवाई ।।
अब मै या बूजुं गुरूदेवा ।। काया माय कहो तत्त भेवा ।।२७।।

अहो स्वामीजी,हा भेद मला आपण समजावून सांगितला,हे सर्व जीव आत्मा आहेत, आता मी अहो गुरुदेवजी,या शरीरात पांच तत्व आपण सांगितले,तर त्याचा भेद मला सांगा. ।।२७।।

हो स्वामीजी कहां कहां द्वार आर सो सांई ।। कहां कहां तत्त बिराजे मांहि ।।
ताको भेव बिध कर कहिये ।। को को आहार कोण बिध लहिये ।।२८।।

अहो स्वामीजी,कोठे कोठे या तत्वाचे द्वार आहे आणि,हे तत्व शरीरात कोठे कोठे राहतात,याचा भेद आणि विधी वेग–वेगळी करुन सांगा,कोण कोणता आहार कोणत्या विधीने घेतो.हे खोलून–खोलून(उकलून–उकलून)सांगा.।।२८।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष मही तत्त को ओ घर भाई ।। सोळे पांख कंवळ कंठ मांही ।।
सब रस साव प्रख के न्यारा ।। मुख दर्वाजा सोभ बिचारा ।।२९।।

गुरुंनी सांगीतले की,हे शिष्य,पृथ्वी तत्वाचे घर कंठात आहे,तेथे सोळा पाकळ्यांचे कमळ आहे,तेथे कंठात सर्व रसांचा स्वाद वेगळा–वेगळा ओळखला जातो,तोंडाच्या दरवाज्याने जे ही खाल्ये जाते,जे तोंडाने खातात,त्याचा रस कंठात ओळखला जातो. ।।२९।।

हे सिष पवन तत्त नाभ घर जाणो ।। बासा आहार घ्राण मुख ठाणो ।।
आछी बुरी न्याव कर देवे ।। पवन आहार बास को लेवे ।।३०।।

हे शिष्य,पवन तत्वाचे घर नाभीमध्ये आहे, याचा आहार सुगंध घेणे आहे व त्याचे तोंड नाक आहे,चांगला सुगंध(चांगल्या सुगंधाची)आणि वाईट(खराब)दुर्गंधाची पारख नाकात होते नाक हे पवन सुघंन्याचा आहार करतो. ।।३०।।

हे सिष तेज तत्त हिये घर जाणो ।। ओ मुख नेण रूप सब खाणो ।।
कर बोपार इसी बिध भाई ।। रूप करूप कहे सम जाई ।।३१।।

हे शिष्य, तेज तत्वाचे घर हृदयात आहे, याचा दरवाजा डोळे आहेत,डोळ्यांनी सर्व रुप पाहणे हा त्याचा आहार आहे, अशाप्रकारे रुप आणि कुरुप पाहण्याचा व्यापार करुन

रुप आणि कुरुप समजून घेतो. ।।३१।।

**हे सिष तोय तत्त भ्रुगटी जाणो ।। ईन्द्री मुख भग आहार बखाणो ।।**
**त्रीया संग बोहोत सुख पावे ।। बिन्द छुटे सो द्वार कुवावे ।।३२।।**

हे शिष्य,जळ तत्वाचे घर भृगुटी आहे असे समजा,इंद्रियाचा मुखाने स्त्रीचा भगाचा भोग करणे,हा इंद्रियाचा आहार आहे.स्त्रीच्या संगाने हा आहार घेतल्याने खुप सुख मिळते.भृगुटीतून विर्य सुटते,लिंग त्याचा दरवाजा आहे. ।।३२।।

**हे सिष धूर आकास तत्त को भाई ।। ब्रम्हंड मांय बण्यो घर जाई ।।**
**सरवण मुख सा अणंद अहारा ।। बाचा ग्यान सुणे सब धारा ।।३३।।**

हे शिष्य,आकाश तत्वाचे घर कान आहे,कानाचे तोंड आकाश तत्वाचा दरवाजा आहे. कानाचा मुखाने शब्द ऐकून,शब्दाचा आनंद घेणे हा याचा आहार आहे,कानाने सर्व वचन आणि ज्ञान ऐकून धारण करुन घेतो.।।३३।।

**हे सिष पांचु तत्त कहया मे तोई ।। आगे लार केण मे होई ।।**
**पण अे घर द्वार इसि बिध भाया ।। सो मे तो कुं बरण बताया ।।३४।।**

हे शिष्य,हे पांच तत्व मी तुला सांगितले,हे पांच तत्व सांगण्यात मागे पूढे झाले आहे, परंतु तत्वाचे हे घर आणि तत्वाचे हे दरवाजे या विधीने आहेत,ज्यांना मी वर्णन करुन तुला सांगितले.।।३४।।

सिष वाच ।।

**तत्त का आहार द्वार सब भाख्या ।। ता मे कछु सनेह न राख्या ।।**
**अब मे या बुजू गुरूराई ।। प्रगत आहार काहा ले खाई ।।३५।।**

शिष्याने सांगितले,अहो स्वामीजी,तत्वाचा आहार आणि तत्वाचे दरवाजे आपण सर्व सांगितले,हे सांगण्यात कोणताही संदेह ठेवला नाही,आता मी गुरुराय आपणास हे विचारतो की,ह्या प्रकृती ज्या आहेत,त्या कोणाचा आहार करतात.।।३५।।

श्री सूखो वाच ।।

**हे सिष असत आहार चोलण को कहिये ।। मेदा आहार धावणो सहीये ।।**
**तुचा नावण केस सुलझाया ।। नाड़ी आहार हुलसण भाया ।।३६।।**

गुरु म्हणाले,हे शिष्य,अस्थि आहार रगडण्याचा घेते(चोळण्याचा)आणि मेदाचा आहार दाबण्याचा घेतो.त्वचेचा आहार आंघोळ-धूणे साफ(स्वच्छ)ठेवणे आहे आणि केसाचा आहार कंगव्याने साफ करणे आहे.नाडीचा आहार उल्हास येणे आहे. ।।३६।।

**मुत्र आहार खोल बोहो होई ।। षट पण अहार थूक को सोई ।।**
**प्रसवे को बाय कुवावे ।। लाळ अहार धुप ले खावे ।।३७।।**

मुत्राचा आहार लघवी करणे आहे.घामाचा आहार हवा आहे,लाळीचा आहार धूप आहे. ।।३७।।

हे सिष बिंद को ओ सुण भाई ।। त्रीयां कंवळ रस ले जाई ।।
अे पाँचु तत्त त्यारग बिस्तारी ।। तोय तत्त सूं उपजण हारी ।। ३८ ।।

हे शिष्य,स्त्रीचा कमळाने रस खिचून गर्भात घेऊन जाण्याचा बिंदुचा आहार आहे,हे पाची तत्व विस्ताराने झाले आहे,हे जळ तत्वापासून उपजणारे आहेत.।।३८।।

हे सिष खुद्या आहार अन्न को लेवे ।। तिरषा आहार जाण निर जल देवे ।।
निद्रा आहार सोवणो भाई ।। आलस लात काम उठाई ।।३९।।

हे शिष्य,भूक अन्नाचा आहार घेते आणि झोप झोपून जाण्याचा घेते,आळसचा आहार येताच करत असलेले काम बंद करुन उठवून देतो. ।।३९।।

हे सिष चेतन प्रगत को सुण भाई ।। म्हेरी संजम सुंई सुख पाई ।।
अे प्रगत पांचु बिस्तारी ।। तामस तत्त सुं ऊपजे सारी ।।४०।।

हे शिष्य,चैतन्यचा आहार,स्त्रीच्या संगमापासून प्रगटतो.सर्व तऱ्हेचे इंद्रिय सुख मिळतात,या पाची प्रकृतीचा विस्तार तामस तत्वाने म्हणजे अग्नी तत्वाने त्याचात उत्पन्न होतात. ।।४०।।

हे सिष गवण आहार अरथ को होई ।। धावण दोड़ जमीयां सोई ।।
लडवे कुं मानव आहारा ।। सामा बचन सुणावण हारा ।।४१।।

हे शिष्य,गवण गावास जाणे,चालणे हा आहार अर्थ म्हणजे मतलबाचा आहे आणि पळणे हा जमीनीच्या आहार घेतो.भांड्ण करणारा मनुष्य असला,समोर भांड्णाचे वचन बोलणारा राहिल्यावर भांड्ण करुन आहार घेतो. ।।४१।।

हे सिष खिलवा को ओ हे अहारा ।। मांगे चिज अरथ बिस्तारा ।।
मून गेण को ओ सुण भाई ।। लेवे अहार ज्ञान को माही ।।४२।।

हे शिष्य,वस्तू मागतो आणि विस्तार करुन सांगतो आहे हा आहार प्रफुल्लीत होण्याचा खिलवाचा आहार आहे,शरीराचा आत ज्ञानाचा आहार घेतो. ।।४२।।

हे सिष अे पाँचु प्रगत बिस्तारी ।। बाय तत्त से उपजण हारी ।।
अब मे सुण ब्रहमंड की भाखूं ।। तो सुं दुज कछु नई राखूं ।।४३।।

हे शिष्य,या पाची तत्वाच्या विस्तार वायू तत्वापासुन उपजला आहे,मी ब्रह्मंड म्हणजे आकाश तत्वची सांगतो,तुझ्यापासून दुसरा विचार म्हणजे सांगण्यात अंतर मी काहीही ठेवत नाही. ।।४३।।

डिंभ प्रगत अे लेत आहारा ।। दावा मुद केहे मुख सारा ।।
मोहो प्रगत माया सुख से वे ।। हिंयाळी आहार नित्त प्रत लेवे ।।४४।।

दावे,मुद्दा तोंडाने सर्व सांगणे हा दंभ प्रकृतीचा आहार घेतो,मोह प्रकृती माया सुख सेवन करते आणि हियाळी म्हणजे आश्वासन हा आहार प्रकृती नित्य प्रती(नेहमी)घेतो.

।।४४।।

हे सिष प्रगत आहार ओ लेवे ।। निरसा बचन छांट सब देवे ।।
धेक आहार इन का ले आई ।। खसा खुन करता रे भाई ।।४५।।

हे शिष्य,प्रकृती आहार घेते वेळी निरसे म्हणजे हलके वचन सर्व निवडून वेगळे करुन देते,हलके वचनांचा आहार द्वेष प्रकृती घेते व धींगा मस्ती करतात. ।।४५।।

हे सिष अरू भाव प्रगत आ भाई ।। लेवे आहार दुख को मांई ।।
अे प्रगत सुण लिजे भाया ।। पांचू बीस रहे इण काया ।।४६।।

हे शिष्य,भाव प्रकृती तनाचा आत दुःखाचा आहार घेते,हे शिष्य,ह्या सर्व पंचवीस प्रकृत्या,या शरीरात राहतात.हे ऐकून घे.।।४६।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी प्रगत खज कहया सब भेवा ।। अब मे या बुजूं गुरूदेवा ।।
मनसो चित्त ज्ञान ओ कुवावे ।। केरा बण्या कहां सु आवें ।।४७।।

शिष्य बोलला की,अहो स्वामीजी,प्रकृतीच्या खाद्याच्या म्हणजे खाण्याचा वस्तुचा सर्व भेद मला सांगितला,आता आणखी ही मी विचारतो की,मन,चित्त आणि ज्ञान म्हणतात (सांगतात)ते तिन्ही कशापासून बनले आणि कोठून येतात.।।४७।।

श्री सुखो वाच ।।

मही तत्त ओ मन ही होई ।। तोय चित्त उपजे सोई ।।
ओ बिचार तेज सुं भाया ।। अणभे ग्यान बाय सुं आया ।।४८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे मन पृथ्वी तत्वाचे बनलेले आहे आणि चित्त जळ तत्वापासून बनलेले आहे,हे विचार,म्हणजे ज्ञान अग्नी तत्वापासुन बनलेले आहे आणि अणभय ज्ञान वायू तत्वापासुन आलेले आहे. ।।४८।।

सिष वाच ।।

हो स्वामाजी सुरत निरत आ बुद्ध कुवावे ।। केंरी बणी कहां सुं आवे ।।
फिर विग्यान कहो गुरूराया ।। केरां बण्या कहां सुं आया ।।४९।।

शिष्य म्हणाला,सुरत आणि निरत तसेच ही बुद्धि म्हणवते ही कोणापासून बनली आणि कोठून येते,आणखी ही गुरुदेव,हे जे विज्ञान आहे हे कशापासून बनले आणि कोठून आले,हे ही सांगा. ।।४९।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष सुरती बणी मही मे भाई ।। तोय तत्त निरत उपजाई ।।
या बुध जोय तेज सुं होई ।। प्रगत लारे बरते सोई ।।५०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,सुरत ही पृथ्वी तत्वापासून बनली आणि जळ तत्वाने निरत उत्पन्न केले. ही बुद्धि अग्नी तत्वापासुन बनलेली आहे, अशा

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

प्रकारे हे सर्व बनतात. ।।५०।।

हे सिष वो बिग्यान ऊपजे आई ।। सो ब्रम्हंड तत्त सु बणीयो भाई ।।
इण आगे नही बार न पारा ।। ता सु बणी या तत्त बिचारा ।।५१।।

हे शिष्य,हे जे विज्ञान येऊन उत्पन्न होते,हे विज्ञान आकाश तत्वापासुन उत्पन्न होते, याच्या पुढे काही वार–पार येत नाही,असे हे तत्व बनलेले आहेत.।।५१।।

सिष वाच ।।

हो स्वामाजी अे सब ही तुम भेव बताया ।। सो मेरे अंतर मन भाया ।।
अब मे या बुजूं गुरू सोई ।। अे आसा त्रिस्ना केरी होई ।।५२।।

शिष्य म्हणाला,अहो स्वामीजी,आपण सर्व भेद सांगीतला,हे सर्व माझ्या निजमनाला भावले,आदि सतगुरु सुखरामजी महाराज आता मी तुम्हाला विचारतो आहे,आशा तृष्णा कोणापासुन बनले आहे.।।५२।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष महि तत्त की त्रिस्ना होई ।। ब्रेहमंड की आसा रहे कोई ।।
लालच लोभ अगन का भाई ।। ममता चाल वाय सुं आई ।।५३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,गुरु म्हणाले,हे शिष्य,तृष्णा पृथ्वी तत्वापासुन बनते आणि आशा आकाश तत्वापासुन बनते.लालुच आणि लोभ अग्नी तत्वापासुन बनलेले आहेत आणि ममता ही वायु तत्वापासुन येते.(चालून येते.)।।५३।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी अे तुम कही सुणी में सोई ।। मरे मन आणन्द घण होई ।।
अब मे या बूजुं गुरू सोई ।। आ लज्जा रीस काहे की होई ।।५४।।

शिष्य बोलला,अहो स्वामीजी,हे सर्व आपण जे सांगितले ते सर्व मी ऐकले,आता माझ्यात आनंद झाला,गुरुदेवजी हे लज्जा आणि रीस कोणापासून बनलेले आहेत.हे मी तुम्हास विचारत आहे,ते आपण सांगावे. ।।५४।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष लज्या सन श्रम सुंन भाई ।। अे तेज तत्त सु उपजे आई ।।
चमके बिये डरे भै आवे ।। अे सब जाण तेज का कुवावे ।।५५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य,लज्जा,शंका आणि शर्म तसेच जो दचकतो,घाबरतो आणि भय उत्पन्न होते,हे सर्व अग्नी तत्वापासुन बनलेले आहेत.।।५५।।

हे सिष तामस रीस क्रोध ओ होई ।। तेज तत्त सुं उपज्या सोई ।।
आ दूर सासी कल्पना क्कावे ।। तेज तत्त सु ये भी आवे ।।५६।।

हे शिष्य,तामस, तमोगुण, रीस आणि क्रोध हे सर्व अग्नी तत्वापासुन उत्पन्न होतात, हे

लांब सोडणे आणि मन हे सर्व अग्नी तत्वापासुन उत्पन्न होतात. ।।५६।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी ओ तम भेद बोहोत बिध भाक्यो । या मे भ्रम कछु नही राख्यो
अब मे या बुजुं गुरू सोई ।। ऐ शिलर साचा काहाँ का होई ।।५७।।

शिष्य बोलला की,अहो स्वामीजी,हा भेद तुम्ही अनेक तऱ्हेने सांगितला,याला सांगण्यात कोणताही भ्रम आपण ठेवला नाही,गुरुजी,हे शिल म्हणजे ब्रह्मचर्य पुर्वक तसेच एक पतिव्रत राहणे आणि सांच म्हणजे विश्वास हे कोणापासून बनतात.।।५७।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष सिलर साच ग्यान बिस्तारा ।। पवन तत्त सुं उपजण हारा ।।
ओ बमेष अेकता सोई ।। ऐ पवन तत्त की पैदा होई ।।५८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य,शिल,सांच(संतोष)आणि ज्ञानाचा विस्तार,हा सर्व वायू तत्वापासुन उत्पन्न होतात.हे विवेक,विषमता तसेच सर्व एकता म्हणजे समता हे सर्व ही वायु तत्वापासुन उत्पन्न होतात. ।।५८।।

सिष वाच ।।

हो स्वामाजी ओ नेटाव नेम घट होई ।। डर भै कदे न उपजे कोई ।।
ऐ कहिये गुरू किण का होई ।। ता का भेव कहिजे मोई ।।५९।।

शिष्य म्हणाला की,अहो स्वामीजी,नेठाव म्हणजे धीर ठेवणे आणि नियम घटात ठेवणे आणि भिती तसेच भय काहीही कधी ही उत्पन्न नाही होणे,हे कोणापासून बनतात, आदि सतगुरु सुखरामजी महाराज आपण याचा भेद मला सांगा. ।।५९।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष ओ नेटाव गिगन सुं होई ।। मही तत्त को पण घट सोइ ।।
ओ चमके बिये डरे ना भाई ।। सो ब्रहमंड तत्त से उपज्यो आई ।।६०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य,हे नेठाव म्हणजे धैर्य ठेवणे आकाश तत्वा पासुन बनले आहे,नियम घटात ठेवणे हे पृथ्वी पासुन बनले आहे आणि हे दचकने भय मानत नाही आणि घाबरत नाही,हे सर्व ही आकाश तत्वापासुन उत्पन्न होतात. ।।६०।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी ऐ तम भेव सरब मुज दिया ।। भांत भांत कर निर्णा किया ।।
अब मे या बुजुं गुरू साई ।। कुण कुण वाय तत्त के माई ।।६१।।

शिष्य बोलला,अहो स्वामीजी,ह्या सर्व भेदाचा वेग वेगळ्या प्रकारे आपण निर्णय केला, आता गुरु स्वामी,हा मी विचार करतो की,कोणता कोणता वायु कोणत्या तत्वात आहे, वायु चौऱ्यांशी आहेत,त्याच्यात कोणत्या तत्वात कोणती वायु आहे,ते मला सांगा. ।।६१।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष पवन ओ अेक ओर नही कोई ।। अे तत्त कर नांव निराला होई ।।
अेसे बाय पांच घट जाणो ।। चोरांसी धर नांव बखाणो ।।६२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे शिष्य,या चौऱ्यांशी वायुमध्ये पवन हा एकच आहे,पवनच्या शिवाय वायुमध्ये दुसरे कोणतेही तत्व नाही,हे सर्व पाच तसेच चौऱ्यांशी वायु घटात उत्पन्न होतात. ।।६२।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी कुण कुण बाय पांच अे होई ।। ता का नांव कहो गुरू मोई ।।
क्युं कर बसे ऊपजे माई ।। न्यारा नांव कहो गुरू साई ।।६३।।

शिष्य बोलला,अहो स्वामीजी,हे पाच वायु कोणते आहेत,तसेच या पाच वायुचे नाव मला सांगा?हे वायु शरीरात कोणत्या तऱ्हेने राहतात आणि कोणत्या तऱ्हेने उत्पन्न होतात,यांचे वेगळे वेगळे नाव आदि सतगुरु सुखरामजी महाराज आपण सांगा ।।६३।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष धनंजय नाग देव दत्त भाई ।। किर कल कोरम कहिये माही ।।
अे पांचु वाय नांव निज जाणो ।। यां लारे छतीस बखाणो ।।६४।।

गुरू बोलले की,हे शिष्य,धनंजय,नाग,देवदत्त,कुर्म,कुर्कुल हे पाच वायु शरीरात आहे,या पाचींच्या मागे छत्तीस वायु आहेत. ।।६४।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी पांचु बाय नांव के दिया ।। निर्णा गुरू बहोत बिध किया ।।
अब मे या बुजुं गुरू आई ।। कोहो तत्त से उपजे कुण वाई ।।६५।।

शिष्य म्हणाला की,अहो स्वामीजी,आपण पांच वायुंचे नाव सांगुन दिलेत,गुरुजी आपण निर्णय अनेक तऱ्हेने केला,आता मी अहो गुरुजी,हे विचारतो की,कोणत्या तत्वाने कोणती वायु उत्पन्न होते?।।६५।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष मही तत्त की धनंजय होई ।। तोय माय नाग सुख जोई ।।
किरकल जाण तेज सुं आवे ।। बाय तत्त की कोरम कुवावे ।।६६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य,धनंजय वायु पृथ्वी तत्वाची आहे आणि जळ तत्वापासुन नाग वायु उत्पन्न होतो,क्रुकल वायु अग्नी तत्वापासुन येते आणि वायु तत्वाची कुर्म वायु आहे. ।।६६।।

हे सिष देवदत्त ब्रहमंड की भाई ।। तेज तत्त सुं उपजे आई ।।
अे पांचु वाय कही मे तोई ।। तत्त तत्त सुं ऐसे होई ।।६७।।

हे शिष्य,देवदत्त वायु आकाश तत्वाची आहे,ही अग्नी तत्वापासुन उत्पन्न होते,ह्या पाची

वायु मी तुला सांगितल्या,तत्व–तत्वापासुन या प्रकारे होतात. ।।६७।।

सिष वाच ।।

**हो स्वामीजी तत्त तत्त की सोज बताई ।। मेरो भ्रम गिऱ्यो भो मांई ।।**
**अब मे या बुजुं गुरू सोई ।। अे उपज्या किम जाणे कोई ।।६८।।**

शिष्य बोलला की,अहो स्वामीजी,तत्वा तत्वाचा शोधू करुन सागींतले,ज्याचाने माझा भ्रम पळून गेला,गुरुजी हे मी विचारतो की,हे जे वायु उत्पन्न झाले याला कोणी कोणत्या तत्वापासुन उत्पन्न झाला,हे कसे समजेल.।।६८।।

श्री सुखो वाच ।।

**हे सिष नाग बाय तन उपजे आई ।। अब ओ प्राण डकारे भाई ।।**
**कोरम से फरके चख तेरा ।। किर कल छींक उछारे झेरा ।।६९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य,शरीरात जेंव्हा नाग वायु उत्पन्न होतो,तेंव्हा ड्कार(ढेकर)येतात.कुर्म वायु उत्पन्न झाल्यावर डोळे फरफर करतात आणि क्रुकल वायु जेंव्हा येते तेंव्हा शिंक येऊ लागते. ।।६९।।

**हे सिष देवदत्त कीया बिध कुवावे ।। ओ तन भाँज उबासी आवे ।।**
**धनंजय सुं सुजे भाया ।। छुटे प्राण देह तन काया ।।७०।।**

हे शिष्य,देवदत्त वायु शरीरात येण्याने आळस येऊन,जांभई येऊ लागते आणि धनंजय वायुचा उत्पन्न होण्याने शरीर फुलु लागते.धनंजय वायू उत्पन्न झाली म्हणजे हा प्राण जेंव्हा जाईल म्हणजे शरीर सुटेल.(धनंजय वायू उत्पन्न झाल्यावर शरीर सुटण्याचे कोणाकडून ही थांबत नाही.)।।७०।।

सिष वाच ।।

**हो स्वामीजी धिन हो आप जुग के मांही ।। मोपे महिमा कही न जाई ।।**
**तुम तो मोय दिखावो अेसा ।। द्वापुर माय ब्यास सुख जेसा ।।७१।।**

शिष्य बोलला,अहो स्वामीजी,आपण संसारात धन्य आहात,आपली महिमा माझ्याने होत नाही,आपण तर मला असे दिसतात,जसे द्वापारयुगात तर वेद व्यास आणि सुकदेव मुनी आहेत तसे मला दिसते,(दिसु लागते)(यावर सेठ साहेब राधाकिसनजी महाराजांची टिप्पन्नी),आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना वेदव्यास आणि सुकदेवाची पदवी देणे,जसे सार्वभौम राजाला गावचा ठाकूर म्हणण्यासारखे आहे. ।।७१।।

**हो स्वामीजी फिर बुजुं आ गुरू सांई ।। अेतो तत्त सदा घट मांही ।।**
**अे बायां तो फिरती सी आवे ।। खिन मे होय पलक मे जावे ।।७२।।**

अहो स्वामीजी,हे पाच तत्व तर नेहमी शरीरात असतात,(राहत आहे)परंतु हे पाची वायु फिरत फिरत एखाद्या वेळी येतात.जसे कधी एखाद्या वेळी कुर्म वायू आल्यावर डोळे फड्फडायला लागतात आणि कधी नाग वायूच्या येण्याने ड्कार(ढेकर)येऊ

लागते.एखाद वेळ क्रुकल वायु येण्याने शिंक येऊ लागते.एखाद वेळ देवदत्त वायू आल्यावर आळस येऊन जांभई येऊ लागते.धनंजय वायु अंत समयी,मरते वेळी येतो, हे वायु तर नेहमी राहत नाही आणि हे पाच तत्व तर शरीरात नेहमी बनलेले राहतात, पृथ्वी तत्व तर शरीरात नेहमी राहते आणि त्या वेळी पृथ्वी तत्वाचा धनंजय वायु अंतसमयी येतो,मरण्याच्या आधी येत नाही,बाकी चारी वायु कुर्म,क्रुकल,नाग,देवदत्त हे तर क्षणात येतात आणि क्षणात चालले जातात,परंतु धनंजय वायु मृत्युनंतर ही शरीरात राहते.(असते)।।७२।।

**हो स्वामीजी ए कहिये मो कुं सब भेवा ।। उपजे मिटे कुण बिध देवा ।।**
**या बिध मोय अंदेसो सांई ।। ए ऊपजे मिटे कुण बिध मांई ।।७३।।**

अहो स्वामीजी,याचा सर्व भेद मला सांगा,तर स्वामीजी,हे वायु कशाप्रकारे उत्पन्न होतात आणि कोणत्या विधीने मिटून जातात,याची मला समज देऊन संदेह मिटवा. ।।७३।।

श्री सुखो वाच ।।

**हे सिष अन जळ जोय मही तत्त पावे ।। पिण पुरण हुवे बाय चल आवे ।।**
**तेज तत्त दुखिया जब होई ।। तब आ बाय उपजे लोई ।।७४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,हे शिष्य,अन्न,जळ पृथ्वी तत्वाशी मिळते पीण पुर्ण होते,तेव्हा नाग वायू चालला जातो.अग्नी तत्वापासून जेंव्हा दुःखी होतो,तेव्हा कुर्म उत्पन्न होते.।।७४।।

**हे सिष प्राण भूत कुं चिंता होई ।। फिर को याद करे नर लोई ।।**
**तब आ बाय चाल कर आवे ।। ब्रहमंड दुखी उबासी खावे ।।७५।।**

हे शिष्य,जेंव्हा प्राण भुताला चिंता होते,तेंव्हा ही कूर्म वायु चालली जाते,आकाश तत्वापासून देवदत्त वायू चालली जाते,तेंव्हा शरीर दुखायला लागते आणि जांभई येऊ लागते.।।७५।।

**हे सिष धनंतर बाय चाल तब आवे ।। जब ओ प्राण देह छिटकावे ।।**
**ता उरीया नही व्यापे भाई ।। या बिध ग्रब उपजे आई ।।७६।।**

हे शिष्य,जेंव्हा धनंजय वायु येते,तेंव्हा हा प्राण शरीर सोड्तो,मरेपर्यंत धनंजय वायु शरीरात येत नाही,अशाप्रकारे हे सर्व वायु उत्पन्न होतात. ।।७६।।

सिष वाच ।।

**हो स्वामीजी ए तम श्रब कहया मुज भेवा ।। अब मे या बुजुं गुरूदेवा ।।**
**उपजत बांय इसी बिध सांई ।। पाछी मिटे कुण बिध मांई ।।७७।।**

शिष्य म्हणाला,अहो स्वामीजी,हे आपण सर्व भेद मला सांगितले,आता मी हे विचारतो की,हे वायू तर उत्पन्न अशातऱ्हेने होतात,परंतु हे वायु शरीरात नंतर कशा तऱ्हेने

मिटतात. ।।७७।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष धनंजय बांय मिटे इसी बिध भाया ।।

चिन्ता जाय सेंण सुख आया ।।७८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,हे शिष्य,धनंजय वायु तर मेल्यानंतर हे शरीर सुकून जाईल तेंव्हा मिटेल.क्रुकळ वायू जेंव्हा तेज म्हणजे गरमी येऊन लागेल तेंव्हा मिटेल.सर्दी झाल्यावर शिंक येऊ लागते,त्यावर गर्मी मिळाल्यावर सर्दी चालली जाते आणि कुर्म वायू,मनाची चिंता मिटून जाते.कोणी सज्जन मिळाल्यावर आणि मनाला सुख आल्यावर कुर्म वायु मिटून जातो. ।।७८।।

हे सिष देवदत्त असे मिट जावे ।। तेज तत्त प्रगत खुल आवे ।।

नाग बाय ऐसी बिध सोई ।। पावे अहार बर फळ कम होई ।।७९।।

हे शिष्य,तेज तत्वापासून प्रकृती खुलून जाते,ज्यामुळे आळस आणि झोप चालली जाते,तेंव्हा देवदत्त वायु मिटून जातो.खाल्लेला आहार,पचून गळून जातो,तेंव्हा नाग वायू कमी होऊन मिटून जातो. ।।७९।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी अे तम मो कुं भेव बताया ।। सो मेरे उर अन्तर आया ।।

अब मे या बुजुं गुरू सांई ।। केसे आहार पचे तन मांई ।।८०।।

शिष्य म्हणाला की,अहो स्वामीजी,आपण मला हा भेद सांगीतला,तो माझ्या हृदयात येऊन गेला,आता मी स्वामीजी,आपणास हे विचारतो की,हा खाल्लेला आहार शरीरात कसा पचून जातो.।।८०।।

श्री सुखो वाच ।।

हे सिष सातु अंग न कहीजे भाई ।। सो जठरा अगन बसे तन माई ।।

ता सुं अहार पचत हे काया ।। ओ सुंण भेद अगन सुं भाया ।।८१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य,सात प्रकारची अग्नि म्हणवते,त्यातील जठराग्नी शरीरात रहाते,त्या जठराग्नीपासून खाल्लेला सर्व आहार शरीरात गळून पचून जातो,हे खाल्लेले अन्न पचण्याचा भेद,जठराग्नी मध्ये आहे.।।८१।।

सिष वाच ।।

हो स्वामीजी निगळे आहार पीवे जळ पाणी । ओ अद बिच कुण थोभे आणी

ता को भेव कहो गुरूराया ।। रूम रूम मे केसे जळ आया ।।८२।।

शिष्य म्हणाला की,अहो स्वामीजी,खाते वेळी अन्न तसेच पाणी ग्रहण करतो,त्याला गळा पिऊन जातो,त्याला गळा गळ्यात ठेवत नाही,तर पुढे मध्ये त्याला कोण थांबवून (रोखून) ठेवतो,याचा भेद मला गुरुराय सांगा, पाणी पोटात पितो, ते रोमा रोमापासून

घामाच्या रुपाने कसे येते. ।।८२।।

श्री सुखो वाच ।।

**हे सिष अेक बायसुं निगळे भाई ।। दुजी बाय थोब दे मांही ।।**
**तीजी अहार चूस सब लेवे ।। चोथी छाँट मल सब देवे ।।८३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य ऐक,वायूपासून खाल्लेले अन्न पाणी गिळून घेतो आणि आत दुसरा वायु त्या खाल्लेल्या अन्न पाण्याला रोखून ठेवतो आणि तिसरी वायु खाल्लेल्या अन्नाचा रस शोषून घेतो.चौथी वायु मळाला छाटून वेगळा करुन देते. ।।८३।।

**हे सिष मल कुं थोब रखे सुंण भाई ।। अे पाँचु बाय रहे तन मांई ।।**
**अेसे बुहार तन का जाणो ।। खावत पीवत सरब बखाणो ।।८४।।**

हे शिष्य,पाचवी वायू मळाला रोखून ठेवते,हे पाची वायू शरीरात आंतमध्ये राहतात.(शरीराचा आत)अशाप्रकारे या शरीरात वायूचे व्यवहार जाणा,खाण्यात पिण्यात या सर्वांत वायूचे कार्य असे आहे हे समजा.।।८४।।

सिष वाच ।।

**हो स्वामीजी ये पाँचु बाय कहां ते होई ।। तां को भेव कहो गुरू मोई ।।**
**को को बाय कुण घर बासा ।। सो सब भेव बतावो आसा ।।८५।।**

शिष्य बोलला की,अहो स्वामीजी,हे पाची वायू गिळणारी,रोखणारी,पचवणारी,रस शोषणारी आणि मल वेगळा करणारी हे शरीरात कोठे रहातात याचा भेद मला सांगा,कोण कोणती वायु शरीरात कोण कोणत्या जागेवर राहतात,याचा सर्वांचा भेद मला सांगा.।।८५।।

श्री सुखो वाच ।।

**हे सिष निगळण बाय तेज की भाई ।। ब्रहमंड की थोबत हे आई ।।**
**चुसण बाय पवन की जाणो ।। मळ छटण सोई तेज बखाणो ।।८६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य,गिळणारी वायु अग्नी तत्वापासून बनली आहे आणि आकाश तत्वाची वायु येऊन रोखून ठेवते.रस शोषण करण्यारी वायू,वायु तत्वापासून उत्पन्न होते आणि मल वेगळे करणारी वायु अग्नी तत्वाची आहे.।।८६।।

सिष वाच ।।

**हो स्वामीजी इंन्द्रि मुळ दोय अे सांई ।। जळ मळ अहार टळे किम माई ।।**
**या को भेव क्हो सम जाई ।। बिंद मुत्र बिछडे किम मांई ।।८७।।**

शिष्य म्हणाला,अहो स्वामीजी,इंद्रियाचे छिद्र आणि मुलद्वार म्हणजे गुदेचा छिद्र हे दोन्ही वेगळे वेगळे होऊन,दोघांचे छिद्रही वेगळे वेगळे आहेत,तर यांच्यात जल(मुत्र)आणि मल हे दोन्ही वेगळे वेगळे होऊन कसे येतात,याचा भेद मला समजाऊन द्या.इंद्रियातून

म्हणजे लिंगातून मुत्र आणि विर्य वेगळे वेगळे कसे निघतात.।।८७।।

श्री सुखो वाच ।।

**हे सिष नाभं कंवळ मे सब मिल जावे ।। अन जळ अहार जि क्युँ नर खावे ।।**
**वां सुंई वो बिछडत हे भाई ।। सो तुज भेव कहुँ समजाई ।।८८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,हे शिष्य,जे काही ही खातो पितो,ते नाभीत म्हणजे पोटात मिळून जाते.अन्न आणि जल किंवा आणखी ही काही आहार घेईल,तो पोटात एकाच जागी मिळून जाते,त्याचा भेद मी समजावून सांगतो.।।८८।।

**हे सिष नाभी बिच कंवळ हे भाई ।। नाड्या गोड़ सकळ उण मांई ।।**
**कस कस नाड बाय ले पाया ।। पिछे टळे इसी बिध भाया ।।८९।।**

हे शिष्य,नाभी मध्ये एक कमळ आहे,चारी बाजूच्या नाड्यांची जड(मुळ)सर्व त्याच्यात आहे,तेथून त्या नाड्या शरीरात रोमा रोमात,नखात आणि डोळ्यात सर्व जागी पोहचतात, तेथील सर्व कस नाडी नाडी श्वासाचा रुपात चालते,तो वायु साऱ्या शरीरात नाड्या मध्ये रस पोहचवतो नंतर शिल्लक राहीलेला मल या तऱ्हेने वेगळा होतो.।।८९।।

**हे सिष जैसे गत कोलू की जाणो ।। एसे कंवळ नाँभ सुं ठाणो ।।**
**वां जठरा अगन सुं पाचे भाई ।। तब झर झर कंवळ भरीजे आई ।।९०।।**

हे शिष्य,जसे उसाचा रस काढण्याच्या कोल्हुची गती आहे,तसेच नाभी कमळात रस काढला जातो,तेंव्हा जठराग्नीपासून खाल्लेल्या अन्नाचे पचन होते,तेंव्हा त्या रसापासून रस झर झर करुन कमळ भरुन जाते,नंतर त्या रसाचे रक्त बनते आणि रक्तापासून मास बनते.।।९०।।

**हे सिष कस कस सकळ चुसले भाई ।। असं बिंद निर टळयो युं मांई ।।**
**रस कस बाय खेच सब लिया ।। पीछे अहार छोड उण दिया ।।९१।।**

हे शिष्य,त्याचा कस सर्व नाड्या शोषून घेतात,असेच बिंदू(वीर्य)मांसाचा मेद आणि मज्जा बनतात आणि त्यापासून हाडे बनतात.हड्डी मधूनच वीर्य बनते,अशाप्रकारे विर्य वेगळे होऊन जाते आणि खाल्लेल्या आहारातून पाणी वेगळे होऊन त्याचे मुत्र बनते, अशाप्रकारे शरीरापासून वेग वेगळे होऊन जातात,रस आणि कस तर वायूपासून सर्व शोषून घेतो अंतर शिल्लक राहीलेले मल बनून जाते. ।।९१।।

**हे सिष एसे अहार छंटे मल सोई ।। भिन भिन भेद कहयो में तोई ।।**
**अब तो कुं मे ठाम बताऊँ ।। बाय वां का निरणा ल्याऊँ ।।९२।।**

हे शिष्य,अशाप्रकारे आहारातून मल वेगळा केला जातो,ज्याचा भिन्न भिन्न भेद मी तुला सांगितला,आता मी तुला त्याची जागा सांगतो,या निरनिराळ्या वायुचा निर्णय करतो. ।।९२।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**हे सिष निगळण बाय तेज की गाजे ।। कंठ कंवळ के माय बिराजे ।।**
**थोभण बाय गाल मे भाई ।। चुंसण बाय नाँभ के मांई ।।९३।।**

हे शिष्य,गिळण्याची वायु अशी तत्वाची आहे,ती कंठ कमळात रहाते आणि रोखणारी वायू गालात आहे.चोखण्याची(शोषण्याची)वायू नाभी मध्ये आहे. ।।९३।।

**हे सिष मळ कुं खाँच छांट दे भाई ।। वासो बाय नाभ के मांई ।।**
**थोबण बाय लिंग मुख जाणो ।। वाई बाय गुदा मुख ठाणो ।।९४।।**

हे शिष्य,मळास खेचून वेगळे करणारी वायु नाभीतच आहे आणि रोखून ठेवणारी वायु लिंगाच्या मुखात आहे आणि हीच रोखून ठेवणारी वायु गुदेच्या मुखात आहे. ।।९४।।

सिष वाच ।।

**हो स्वामीजी लिंग मुख अेक दोय ना सांई ।। बिंद मुत्र बिछड़े किम मांई ।।**
**यां को भेव कहो गुरूराया ।। केंसे बिंद छुटत इण काया ।।९५।।**

शिष्य म्हणाला की,अहो स्वामीजी,लिंगाला तोंड तर दोन दिसून येत नाही,(दिसत नाही) तरीही लिंगातून मुत्र आणि विर्य वेगळे वेगळे कसे होतात,गुरुराय,याचा भेद मला सांगा, त्या शरीरातुन विर्य कसे सुटते.।।९५।।

श्री सुखो वाच ।।

**हे सिष बिन्द को बास शिश पर होई ।। मुत्र वास कमर संघ जोई ।।**
**नाड़ा दोय मुख हे अेकी ।। जेसे सेर पोल बिध पेखी ।।९६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,हे शिष्य,बिंदचे राहण्याचे स्थान, मस्तकाच्या वरती भृगुटीत आहे आणि मुत्राचे स्थान कमरेच्या जोडावर आहे,यांची विर्याची आणि मुत्राच्या दोन वेग वेगळ्या नाड्या आहेत,परंतु मुख एकच आहे,जसे शहरात(वेशीला)सरहद्दीला दरवाजा एकच असतो,त्यातून शहरातून सडक आणि रस्ते वेग वेगळे येऊन,एकाच दरवाज्यातून बाहेर निघतात,अशाप्रकारे मुत्र आणि विर्य वेग वेगळ्या नाड्यांपासून येऊन,एकाच मुखातून बाहेर निघतात. ।।९६।।

**हे सिष मन मंछया म्हेरी चीत्त आवे ।। मथन बाय सो काम चलावे ।।**
**अेसें बिंद छुटत हे भाई ।। मुत्र कंवळ पुरण व्हे मांई ।।९७।।**

हे शिष्य,मनात इच्छा झाली आणि स्त्री चित्तात आली किंवा स्त्रीवर मन गेले आणि स्त्रीसी मैथून केल्यावर तेथून म्हणजे भृगुटीतून काम चालत येते,अशाप्रकारे विर्य सुटते आणि मुत्र जेंव्हा मुत्र कमळ म्हणजे मुत्राची पिशवी पूर्ण भरून जाते,तेंव्हा लघवी होते. ।।९७।।

।। इति ग्यान गोष्ट को अंग संपूरण ।।